वाचा - १. महालेखापरीक्षक, मुंबई यांचे पत्र क्र.SSI/TGS/F-६४१/ow-२९७, दि.२९/०१/२०१८.

---

स्था.१८/ब/ अहवाल शाखा /वलेप अहवाल/न.क्र.१८३/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४**

**कार्यालयीन आदेश क्र. 03/२०१८, दिनांक -** 1 JUN 2018

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखा परिक्षणासबंधी सूचना.

**प्रस्तावना:-**

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाची प्रक्रिया व कार्यपध्दती ही भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वे व मानकांनुसार तसेच मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ व महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश २०११ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून राबविण्यांत येते. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेद्वारा स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत निर्गमित होणाऱ्या लेखापरीक्षण अहवालांचे वेळोवेळी पुर्नविलोकन करुन लेखापरीक्षण कार्यपध्दती अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनपर सूचना निर्गमित करण्यात येतात.

महालेखापरीक्षक, मुंबई यांनी वाचा मधिल १ वर नमूद पत्रान्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत निर्गमित झालेल्या माहे डिसेंबर २०१७ अखेर संपणाऱ्या तिमाही कालावधीतील जिल्हा परिषद लेखापरीक्षण अहवालांचे पुर्नविलोकन करुन आक्षेपांची व्याप्ती व निष्कर्ष याबाबत सुधारणा सुचविल्या आहेत. त्याअनुषंगाने लेखापरीक्षण कार्यपध्दती व लेखापरीक्षण अहवालाची मांडणी याबाबत पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आदेशः-**

१. लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदविताना संबंधित विभागांने / संस्थेने संबंधित अर्धशासकीय ज्ञापनाच्या अनुषंगाने सादर केलेल्या अनुपालनाचा आक्षेपात अंतर्भाव करावा. व त्याबाबत लेखापरीक्षकाचे अभिप्राय आक्षेपात नमूद करावेत. अर्धसमासिक ज्ञापनांची उत्तरे विहित मूदतीत प्राप्त करुन घेण्यावर भर देण्यांत यावा.

२. समाज कल्याण विभागाचे अंतर्गत येणाऱ्या वसतिगृहानां संबंधीत लेखापरीक्षण वर्षात अनुदान संवितरीत करण्यांत आले नसल्यास संबंधित वसतिगृहे बंद झाली असल्याचा निष्कर्ष नोंदविण्यापूर्वी अभिलेख्यांची काटेकोरपणे तपासणी करुन याबाबत अनुषंगिक अभिप्राय आक्षेपात नोंदविण्यात यावेत.

३. समाज कल्याण विभागाचे अंतर्गत शिष्यवृत्त्यांवर झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करतानां सदर शिष्यवृत्त्या विहित मुदतीत व त्याच शैक्षणिक वर्षात प्रदान करण्यांत आल्या किंवा कसे ? शिष्यवृत्ती प्रदानास विलंब झाला किंवा कसे ? याबाबत तपासणी करुन विहित मूदतीत शिष्यवृत्त्या प्रदानकरता न आल्यामुळे संबंधीत विद्यार्थी वंचित राहीले नाहीत याची खातरजमा करणे आवश्यक आहे.

४. वित्त विभागाच्या लेखापरीक्षण अहवालात "कलम ड मधिल आक्षेप" या सदरात " वार्षिक लेखे प्रमाणिकरणाबाबत आक्षेप" या शिर्षकाखाली राखीव निधी, वार्षिक लेखे, बँक ताळमेळ विवरणपत्र, घसारा निधी, मंजूर वार्षिक अनुदान व प्रत्यक्ष खर्च व कर लेव्ही आणि इतर येणे याबाबतचे आक्षेप स्वतंत्ररीत्या नोंदविण्यात यावेत.

उपरोक्त निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

(प्रताप मोहिते)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:- सर्व सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांना पुढील कार्यवाहीस्तव.